# शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य

शासनमान्यता : सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. संघटना 1516/प्र.क्र. 314/16 अ. दि. 03/09/2016

पत्रव्यवहाराचा पत्ता : श्री. संतोष मलेवार, सरचिटणीस, प्लॉट नं. १११९/१-अ, आशिर्वाद नगर बँक कॉलनी, नागपूर-440 024.

E-mail id : secsainikmaha@gmail.com मोबा. 9970098765 Website : www.sainikmaha.com

| राज्याध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य सरचिटणीस | राज्य चिटणीस | राज्य कोषाध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| श्री. बाजीराव देशमुख | श्री. राजीव जामोदकर | श्री. संतोष मलेवार | श्री. बाळासाहेब जाधव | श्री. विवेक पांडे |
| 7350613119 | 9421561107 | 9923200051 | 8390499025 | 9421484398 |

• मुख्य मार्गदर्शक •
श्री. चंद्रशेखर आलेगांवकर

• मुख्य सल्लागार •
श्री. कमलाकर शेटे
श्री. प्रकाश कुलकर्णी

• सल्लागार मंडळ •
श्री. सुधाकर तकीत
श्री. सुरेश माने
श्री. विलास घाडगे
श्री. दिलावर शादीवान

• विभागीय उपाध्यक्ष •
पुणे विभाग :
श्री. प्रकाश भिल्लारे
9604420335
औरंगाबाद विभाग :
श्री. ह्युन पठाण
7774075999
नागपूर विभाग :
श्री. सुधाकर सार्वे
9765460832
कोकण विभाग :
श्री. सोमालिंगा बिराजदार
8052359038
अमरावती विभाग :
श्री. अरविंद कोरपे
8411080202
मंत्रालय विभाग :
श्री. उमाकांत भुजबळ
9561157352


जावक क्र. ०३/ २०२३ दिनांक : १२ जानेवारी २०२३

प्रति,

मा. नामदार श्री गिरीश महाजन
मंत्री, ग्रामविकास
महाराष्ट्र राज्य

विषय: ग्रामविकास विभागांर्तगत जिल्हा परिषदेत कार्यरत पुनर्नियुक्त माजी सैनिकांना शासन निर्णय क्रमांकः पिब- ४१४/प्र.क्र./११२/आस्था-१४ दिनांक १५ मे २०१४ च्या सर्वसाधारण बदल्यांबाबतचे धोरण क्रंमाक ३ (क) नंतरच्या धोरणात समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४१५/कार्यासन १२.दि. २१ नोव्हेंबर २०२२.

२) ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: जिपब-४२४/प्र.क्र./११२/आस्था-२१४, दि. १५ मे, २०१४.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१७/प्र.क्र. ४१५/कार्यासन १२..दि. ०९ एप्रिल, २०१८.

मा. महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपणास सविनय कळविण्यात येत आहे की, संदर्भिय क्र. १ नुसार सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयामध्ये 'शासकीय कर्मचारी पुनर्नियुक्त माजी सैनिक असल्यास व त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र ३० एप्रिल पुर्वी बदली प्राधिकाऱ्याकडे सादर केल्यास त्यांची प्रशासकीय सोयीनुसार व पद उपलब्धतेनुसार त्यांच्या सोयीच्या ठिकाणी बदली करण्यात यावी', असे शासनाने स्पष्ट नमुद केलेले आहे. यानुसार सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयानुसार सर्व विभागातील सेवारत पुनर्नियुक्त माजी सैनिकांना बदलीमध्ये प्राधान्यक्रम मिळेल.

परंतु महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास विभागाची बदली धोरण ही संदर्भिय क्र. २ चे शासन निर्णयानुसार अंमल बजावणी केली जाते. सदर शासन निर्णयातील प्रकरण-१ मधील अ.क्र. ३ व ४ नुसार बदली धोरणात सुट व प्राधान्यक्रम ठरविण्यात आलेले आहे. यानुसार सदर शासन निर्णयातील बदली धोरण ४(२) मधील अ.क्र. (५) मध्ये आजी/माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी तसेच ४(४) मधील अ.क्र. (६) मध्ये आजी/माजी सैनिक व अर्धसैनिक जवानांच्या पत्नी / विधवा याप्रमाणे प्राधान्यक्रम दिलेला आहे. तसेच संदर्भिय क्र. ३ चे शासन निर्णयातील परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र २ मध्ये नमूद केलेले प्राधान्यक्रम हे संदर्भिय क्र. २ चे शासन निर्णयातील बदली धोरण क्र. ३ मध्ये पुर्णतः सुट दिलेली आहेत व बदली धोरण क्र. ४ मध्ये पुन्हा प्राधान्यक्रमात सुध्दा नमुद केलेली आहेत.

# शासकीय पुनर्नियुक्त माजी सैनिक संघटना, महाराष्ट्र राज्य

शासनमान्यता : सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. संघटना 1516/प्र.क्र. 314/16 अ. दि. 03/09/2016

पत्रव्यवहाराचा पत्ता : श्री. संतोष मलेवार, सरचिटणीस, प्लॉट नं. १११९/१-अ, आशिर्वाद नगर बँक कॉलनी, नागपूर-440 024.

E-mail id : secsainikmaha@gmail.com मोबा. 9970098765 Website : www.sainikmaha.com

| राज्याध्यक्ष | राज्य उपाध्यक्ष | राज्य सरचिटणीस | राज्य चिटणीस | राज्य कोषाध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| श्री. बाजीराव देशमुख | श्री. राजीव जामोदकर | श्री. संतोष मलेवार | श्री. बाळासाहेब जाधव | श्री. विवेक पांडे |
| 7350613119 | 9421561107 | 9923200051 | 8390499025 | 9421484398 |

• मुख्य मार्गदर्शक •

श्री. चंद्रशेखर आलेगांवकर

• मुख्य सल्लागार •

श्री. कमलाकर शेटे

श्री. प्रकाश कुलकर्णी

• सल्लागार मंडळ •

श्री. सुधाकर तकीत

श्री. सुरेश माने

श्री. विलास घाडगे

श्री. दिलावर शाढीवान

• विभागीय उपाध्यक्ष •

पुणे विभाग :
श्री. प्रकाश भिल्लारे
9604420335

औरंगाबाद विभाग :
श्री. ह्युन पठाण
7774075999

नागपूर विभाग :
श्री. सुधाकर सार्वे
9765460832

कोकण विभाग :
श्री. सोमालिंगा बिराजदार
8052359038

अमरावती विभाग :
श्री. अरविंद कोरपे
8411080202

मंत्रालय विभाग :
श्री. उमाकांत भुजबळ
9561157352


मात्र या प्राधान्य क्रमात माजी सैनिकास फारसा फायदा मिळत नाही असे दिसून येत आहे. किंवा सर्वसाधारण बदल्यांचे धोरणात शासकीय कर्मचारी पुनर्नियुक्त माजी सैनिक असल्यास त्यांना बदलीत सुट किया प्राध्यान्यक्रम सुद्धा देण्यात आल्याचे नमूद करण्यात आलेले नाही.

महोदय, भारतीय संरक्षणातील आपल्या कुटुंबियापासून दूर राहून केलेली देश सेवा व वयाच्या ४० ते ४५ वर्षाच्या वर्षामानात सेवानिवृत्त होऊन महाराष्ट्र शासनाच्या सेवेत कार्यरत असतांना पुन्हा घरापासून दूरवर राहून सेवा द्यावी लागत आहे. तरी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत सेवारत असणान्या पुर्ननियुक्त माजी सैनिक अधिकारी व कर्मचारी यांना सुध्दा संदर्भिय क्र. १ मध्ये नमूद नुसार शासन निर्णया प्रमाणे सोयीच्या ठिकाणी बदली मिळण्यास प्राधान्यक्रम मिळणे आवश्यक आहे.

करीता संदर्भिय क्र. १ चे शासन निर्णयाचे धरतीवर ग्रामविकास विभागाचे बदली धोरणाबाबतचे संदर्भिय क्र. २ चे शासन निर्णयातील प्रकरण १ मधील बदली धोरण ३ (क) च्या नंतर येणान्या बदली धोरणात जे जिल्हा परिषद कर्मचारी पुर्ननियुक्त माजी सैनिक असतील व त्याबाबतचे सक्षम प्राधिकान्याचे प्रमाणपत्र बदली प्राधिकाऱ्याकडे सादर करतील त्यांना बदलीतून सुट देण्यात यावी' असे धोरण समाविष्ट करण्यात यावे. अन्यथा ग्रामविकास विभागाचं संदर्भिय क्र. २ चे शासन निर्णयातील I बदली धोरण क्रमांक ४(२) (५) व ४(४) (६) अनुसारच महाराष्ट्र शासनातील सर्व विभागांतर्गत कार्यरत शासकीय पुर्ननियुक्त मानी सैनिकांना बदली धोरणांमध्ये एकसारखा लाभ मिळावा व प्राधान्य क्रमातून वंचित राहू नये हि सविनय विनंती करणेत येत आहे.

माहिती व पुढील योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर.

संतोष मलेवार
सरचिटणीस

बाजीराव देशमुख
राज्याध्यक्ष

प्रत : - मा. मुख्य प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहिती व पुढील योग्य कार्यवाहीस्तव सविनय सादर.